जनसंपर्क कक्ष
0 6 MAR 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शरीरसौष्ठव स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाला अजिंक्यपद

## दोन सुवर्णपदकांची कमाई : येणेपोया विद्यापीठात आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कर्नाटकातील येणेपोया विद्यापीठात झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ शरीरसौष्ठव स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाने दोन सुवर्णपदके पटकावून अजिंक्यपद पटकाविले. या स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठातून आठ खेळाडूंची निवड झाली होती.

कर्नाटकातील येणेपोया विद्यापीठात २०, २१ आणि २२ फेब्रुवारी रोजी झालेल्या या स्पर्धेत ६० किलो वजनी गटामध्ये अवधूत निगडे याने सुवर्ण आणि ७० किलो वजनी गटामध्ये रोहित बोगन याने सुवर्णपदक पटकाविले. ६५ किलो वजनी गटामध्ये अर्जुन मोगले याचा पाचवा क्रमांक आला. ७० किलो वजनी गटांमध्ये विशाल पाटीलचा चौथा क्रमांक आला. शिवाजी विद्यापीठाने एकूण १७ गुणांची कमाई करत या स्पर्धेचे अजिंक्यपद पटकाविले. या स्पर्धेमध्ये ९७ विद्यापीठातील ३५० खेळाडू सहभागी झाले होते. शिवाजी विद्यापीठाच्या संघाबरोबर व्यवस्थापक आणि प्रशिक्षक म्हणून प्रा. व्ही. एस. यमगेकर यांनी काम पाहिले. येणेपोया विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी आंतरराष्ट्रीय शरीरसौष्ठव संघटनेचे सचिव सुजित के. व्ही. यांच्या हस्ते अजिंक्यपदाचा चषक शिवाजी विद्यापीठास प्रदान करण्यात आला. विजयी संघाला शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, तसेच प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रोत्साहन मिळाले.



अखिल भारतीय आंतरविद्यापीठ शरीरसौष्ठव स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावलेल्या खेळाडू आणि संघ व्यवस्थापक, तसेच प्रशिक्षकांना प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ. शरद बनसोडे उपस्थित होते.

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ संघाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावलेल्या खेळाडूंना व संघ व्यवस्थापक, कोच यांना शुभेच्छा देताना प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. शरद बनसोडे.

# अ.भा. आंतरविद्यापीठ बॉडीबिल्डिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ चॅम्पियन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी बॉडीबिल्डिंग स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाने दोन सुवर्णपदके पटकावली. विद्यापीठाने १७ गुणांची कमाई करत ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी बॉडीबिल्डिंग स्पर्धेची चॅम्पियनशिप पटकावली.

कर्नाटकात विद्यापीठात या स्पर्धा झाल्या. विद्यापीठातून आठ खेळाडूंची निवड झाली होती. ६० किलो वजनी गटात अवधूत निगडे व ७० वजनी गटात रोहित बोगन याने सुवर्णपदक मिळविले. स्पर्धेत देशभरातून ९७ विद्यापीठांतील ३५० बॉडीबिल्डर्सनी सहभाग नोंदवला. विद्यापीठाच्या संघाबरोबर मॅनेजर कम कोच म्हणून प्रा. व्ही. एस. यमगेकर यांनी काम पाहिले.

06 MAR 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इंटर युनिव्हर्सिटी बॉडी बिल्डिंग स्पर्धेत विद्यापीठाला विजेतेपद

कोल्हापूर, ता. ५ : कर्नाटकातील येणेपोया युनिव्हर्सिटी येथे २० ते २२ फेब्रुवारी दरम्यान ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी बॉडी बिल्डिंग स्पर्धा झाली. त्यात शिवाजी विद्यापीठाने एकूण १७ गुणांची कमाई करत विजेतेपद पटकविले. स्पर्धेत ६० किलो वजनीगटामध्ये अवधूत निगडे आणि ७० किलो वजनीगटात रोहित बोगन यांनी सुवर्णपदक पटकविले. ६५ किलो वजनीगटामध्ये अर्जुन मोगले याने पाचवा, तर ७० किलो वजनीगटामध्ये विशाल पाटील याने चौथा क्रमांक मिळविला. विद्यापीठाच्या संघाला स्पर्धेचे समन्वय सचिव सुजित के. व्ही. यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान केले. संघाला कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. या स्पर्धेमध्ये देशातील ९७ विद्यापीठांतील ३५० स्पर्धक सहभागी झाले.




**कोल्हापूर :** ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी बॉडी बिल्डिंग स्पर्धेचे विजेतेपद मिळविणाऱ्या विद्यापीठाच्या खेळाडूंचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी अभिनंदन कले. यावेळी शेजारी क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे.

0 6 MAR 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या यशस्वी खेळाडूंचा सत्कार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी बॉडी बिल्डिंग स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठातून आठ खेळाडूंची निवड झाली होती. या स्पर्धा येणेपोया युनिव्हर्सिटी, कर्नाटक येथे पार पडल्या. या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंनी चकमदार कामगिरी केली. यशस्वी खेळाडूंचा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



**कोल्हापूर : ऑल इंडिया आंतरविद्यापीठ बॉडी बिल्डिंग स्पर्धेमध्ये यश मिळवलेल्या खेळाडूंसोबत मान्यवर.**

या स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाने दोन सुवर्णपदके पटकावली. यामध्ये ६० किलो वजनी गटामध्ये अवधूत निगडे सुवर्ण व ७० वजनी गटामध्ये रोहित बोगन सुवर्ण, त्याचबरोबर ६५ किलो वजनी गटामध्ये अर्जुन मोगले याने पाचवा क्रमांक मिळवला. ७० किलो वजनी गटामध्ये विशाल पाटील याने चौथा क्रमांक मिळवला. शिवाजी विद्यापीठाने एकूण १७ गुणांची कमाई करत या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी बॉडी बिल्डिंग स्पर्धेची चॅम्पियनशिप पटकवली. या स्पर्धेमध्ये देशभरातून ९७ विद्यापीठांतील ३५० बॉडी बिल्डरनी सहभाग नोंदवला होता. या विद्यापीठाच्या संघाबरोबर मॅनेजर कम कोच म्हणून प्रा. व्ही. एस. यमगेकर यांनी काम पाहिले. विजयी संघाला शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तसेच प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रोत्साहन लाभले.

पुढारी

# शिक्षणशास्त्र अधिविभागातील विद्यार्थी इंटर्नशिपसाठी युरोपला जाणार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ शिक्षणशास्त्र अधिविभागात एड्युरीफोर्म आंतरराष्ट्रीय प्रकल्प सुरू आहे. प्रकल्पांतर्गत शिक्षणशास्त्र अधिविभागातील एम.एड. व बी.एड., एम.एड.(एकात्मिक) अभ्यासक्रमाचे आठ विद्यार्थी महिनाभर इंटर्नशिपसाठी इटली, जर्मनी व फिनलंड या युरोपियन देशांत जाणार आहेत. प्रकल्पास इरास्मस प्लस प्रोग्रॅम ऑफ युरोपिअन युनियन यांचे अर्थ सहाय्य लाभले आहे. शिक्षणशास्त्र अधिविभाग प्रकल्पाचा एक भागीदार आहे. इंटर्नशिपमध्ये, भारतीय शिक्षण पद्धती व युरोपिअन शिक्षण पद्धतींमधील मुख्यत: शिक्षक प्रशिक्षणाची जागतिक सद्यस्थिती, शिक्षक प्रशिक्षणातील आव्हाने, बदलत्या अध्ययन व अध्यापन पद्धती, शिक्षक प्रशिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण व नवनवीन उपक्रम यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. प्रकल्पाचे समन्वयक म्हणून अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. प्रतिभा पाटणकर काम पाहत आहेत.

जनसंपर्क कक्ष
0 6 MAR 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात संशोधनास उपयुक्त पर्यावरण

## इंग्लंडच्या शिष्टमंडळाचे कौतुकोद्गार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील वैज्ञानिक उपकरणे व साधने ही अत्याधुनिक स्वरूपाची असून अद्ययावत संशोधनासाठी अतिशय उपयुक्त पर्यावरण आहे, असे कौतुकोद्गार इंग्लंड येथील एस्पी उद्योग समूहाच्या शिष्टमंडळाने काढले.

शिष्टमंडळाने नुकतीच विद्यापीठातील नॅनो सायन्स व तंत्रज्ञान अधिविभागात स्थापित सेराफ्लक्स कंपनीच्या वैज्ञानिक उपकरणांच्या प्रात्यक्षिकाच्या पाहणीसह पदार्थविज्ञान अधिविभाग, सैफ-डीएसटी केंद्र येथील संशोधनपूरक उपकरणे व सुविधांची पाहणी केली.

नॅनोसायन्स अधिविभागातील शास्त्रीय उपकरणे व संशोधन प्रक्रियेबाबत डॉ. के. के. शर्मा यांनी माहिती दिली. त्यानंतर पदार्थविज्ञान अधिविभाग येथे डॉ. के. वाय. राजपुरे व डीएसटी-सैफ केंद्र येथे डॉ. आर. जी. सोनकवडे यांच्या नेतृत्वाखाली शास्त्रीय तथा तांत्रिक सुविधा, अद्ययावत उपकरणांच्या प्रयोगशाळांची त्यांनी पाहणी केली. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्यासह विद्यापीठातील प्रमुख अधिकाऱ्यांशी संवाद साधला.

पुण्यनगरी

# विद्यापीठाचे विद्यार्थी इंटर्नशिपसाठी युरोपला

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभागामध्ये एड्युरीफोर्म हा आंतरराष्ट्रीय प्रकल्प २०१९ पासून सुरू आहे. या प्रकल्पांतर्गत शिक्षणशास्त्र अधिविभागातील एम.एड., बी. एड., एम.एड. (एकात्मिक) अभ्यासक्रमाचे आठ विद्यार्थी एक महिना इंटर्नशिपसाठी इटली, जर्मनी व फिनलंड या युरोपियन देशांमध्ये जाणार आहेत.

युरोपमधील इंटर्नशिपबरोबरच अधिविभागातील सोळा विद्यार्थी चित्कारा युनिव्हार्सिटी, पंजाब, महाराजा सयाजीराव युनिव्हार्सिटी, गुजरात, सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हार्सिटी, महाराष्ट्र व सीएक्सएस सोल्युशन, केरळ येथे एक महिना इंटर्नशिप पूर्ण करण्यासाठी जाणार आहेत. या इंटर्नशिपमध्ये भारतीय शिक्षण पद्धती व युरोपियन शिक्षण पद्धतीमधील मुख्यतः शिक्षक प्रशिक्षणाची जागतिक सद्यःस्थिती, शिक्षक प्रशिक्षणातील आव्हाने, बदलत्या अध्ययन व अध्यापन पद्धती, शिक्षक प्रशिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण व नवनवीन उपक्रम यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. या प्रकल्पाचे समन्वयक म्हणून अधिविभागप्रमुख डॉ. प्रतिभा पाटणकर काम पाहत आहेत. ही इंटर्नशिप यशस्वी करण्यासाठी अधिविभागातील डॉ. विद्यानंद खंडागळे, या प्रकल्पाच्या व्यवस्थापक डॉ. गीतांजली जोशी आणि सर्व शिक्षकांचे सहकार्य लाभले आहे.

0 6 MAR 2023 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# केएमसी महाविद्यालयाचा परिसर पर्यावरणपूरक

## शिवाजी विद्यापीठाकडून प्रमाणपत्र; केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या निकषानुसार ग्रीन ऑडिट

**कोल्हापूर :** कोल्हापूर महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण (केएमसी) महाविद्यालयाचा परिसर हा पर्यावरणपूरक असल्याचे प्रमाणपत्र शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागाकडून प्राप्त झाले आहे. यात महाविद्यालय परिसरात असलेल्या मोठमोठ्या वृक्षांमुळे आल्हाददायी वातावरण आणि शुद्ध हवा मिळत असल्याची नोंद केली आहे, तसेच महाविद्यालयाकडून विजेचा योग्य वापर करत असल्याबाबत प्रशंसा करण्यात आली आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व पर्यावरण मंत्रालय (नवी दिल्ली) यांच्या निकषानुसार हे पर्यावरणीय लेखापरीक्षण करण्यात आले. यात हवा, ऊर्जा, पाणी, सांडपाणी, घनकचरा व्यवस्थापन, हरित परिसर या घटकांच्या नोंदी घेतलेल्या आहेत. या कॉलेजला महानगरपालिकेच्या प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे, उपायुक्त शिल्पा दरेकर व प्रभारी प्राचार्य डॉ. अरुण पौडमल यांचे मार्गदर्शन लाभले. यशवंतराव चव्हाण (केएमसी) महाविद्यालयाचा परिसर हा पर्यावरणपूरक असल्याचे प्रमाणपत्र मिळाल्याने आयक्यूएसीचे समन्वयक डॉ. संजय कांबळे, भूगोल विभागप्रमुख डॉ. जे. एम. शिवणकर, पर्यावरण शिक्षिका कुमुदिनी झिटे, डॉ. युवराज मोटे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे यांनी अभिनंदन केले आहे.

सकाळ



**कोल्हापूर :** कंपनीच्या अधिकाऱ्यांनी स्कूल ऑफ नॅनो सायन्स, डीएसटी-सैफ सेंटरला भेट देऊन तेथील संशोधन, उपकरणांची माहिती जाणून घेतली.

# इंग्लंडच्या कंपनीने घेतली विद्यापीठातील संशोधनाची दखल

कोल्हापूर, ता. ५ : इंग्लंडमधील ईस्पी लिमिटेडने शिवाजी विद्यापीठातील संशोधनाची दखल घेतली. या कंपनीच्या अधिकाऱ्यांनी स्कूल ऑफ नॅनो सायन्स, डीएसटी-सैफ सेंटरला भेट देऊन तेथील संशोधन, उपकरणांची माहिती जाणून घेतली. विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजीचे औद्योगिक भागीदार सेराफ्लक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आहे.

या कंपनीच्या महत्त्वाच्या औद्योगिक समस्येच्या निरसनासाठी डॉ. किरणकुमार शर्मा यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या टीमचे संशोधन सुरू आहे. त्यातूनच एका विशिष्ट अशा महत्त्वपूर्ण उत्पादनाचे संशोधन आणि निर्मिती होत आहे. त्या उत्पादनाच्या मूलघटकांची गुणधर्मतपासणी सैफ सेंटर आणि पदार्थविज्ञान अधिविभाग यांच्या साहाय्याने होत आहे. त्याअनुषंगाने ईस्पी लिमिटेड कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक डेव्हिड कॅरिंग्टन, 'सेराफ्लक्स'चे चेअरमन संजीव तुंगतकर, आदींनी विद्यापीठाला भेट दिली. त्यांनी प्रयोगशाळांना भेट दिली. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्याशी संवाद साधला. नॅनोसायन्स अधिविभागातील शास्त्रीय उपकरणे आणि संशोधन प्रक्रियेची माहिती डॉ. शर्मा यांनी दिली. विद्यापीठातील संशोधन, उपकरणांबाबत कॅरिंग्टन यांनी समाधान व्यक्त केले. इंग्लंडमधील अधिकाऱ्यांची भेट शिवाजी विद्यापीठ आणि नॅनोटेक्नॉलॉजी आणि त्या तंत्रज्ञानावर आधारित लोकल ते ग्लोबल कंपन्यांसाठी महत्त्वाची ठरेल, असा विश्वास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केला. डॉ. आर. जी. सोनकवडे, के. वाय. राजापुरे, डॉ. ठकार, डॉ. सपली, पी. डी. राऊत, एस. बी. सादळे, एस. डी. डेळेकर उपस्थित होते.

सकाळ




**कोल्हापूर :** ज्ञानदा साहित्यिक मंचच्या 'पयोदवर्षा' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करताना प्रा. डॉ. रणधीर शिंदे. शेजारी अन्य.

# लिहिल्याने माणूस समृद्ध बनतो : डॉ. रणधीर शिंदे

कोल्हापूर, ता. ५ : साहित्य लेखन माणसाच्या आयुष्याशी निगडित असते. असे लिखाण केल्याने माणूस समृद्ध बनतो, असे शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभाग प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी सांगितले. करवीर नगर वाचन मंदिर येथे ज्ञानदा साहित्यिक मंच आयोजित 'पयोदवर्षा' या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी अपर्णा पाटील व कवी संम्मेलनाच्या अध्यक्षस्थानी डॉ. संजीवनी तोफखाने, शर्मिष्ठा ताशी होत्या. प्रियदर्शनी चोरगे प्रमुख उपस्थित होत्या.

डॉ. शिंदे म्हणाले, "आपल्या मनातील तिन्ही ऋतू लेखक आपल्या शब्दातून प्रकट करीत असतो. आपल्या मनातील भावना कवी मांडत असतो."

अपूर्वा पाटील, नीता क्षीरसागर, युवराज राजीगरे, राजू करनूरकर उपस्थित होते. प्रास्ताविक संयोगीता महाजन यांनी केले. आभार दीप्ती कुलकर्णी यांनी मानले.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी करणार युरोपियन देशांमध्ये 'इंटर्नशिप'

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात एड्युरीफोर्म हा आंतरराष्ट्रीय प्रकल्प सुरू आहे. या प्रकल्पांतर्गत विद्यापीठाचे विद्यार्थी युरोपियन देशांमध्ये इंटर्नशिप करणार आहेत.

या शिक्षणशास्त्र अधिविभागातील एम.एड. व बी.एड.-एम.एड. (एकात्मिक)अभ्यासक्रमाचे आठ विद्यार्थी एक महिना इंटर्नशिप पूर्ण करण्यासाठी इटली, जर्मनी, फिनलंड या युरोपियन देशांमध्ये जाणार आहेत. अधिविभागातील अन्य १६ विद्यार्थी चित्कारा युनिव्हार्सिटी(पंजाब), महाराजा सयाजीराव युनिव्हार्सिटी (गुजरात), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि सी. एक्स.एस. सोल्युशन (केरळ) येथे एक महिना इंटर्नशिप पूर्ण करण्यासाठी जाणार आहेत. या विद्यार्थ्यांचा सर्व खर्च 'एड्युरीफोर्म 'प्रकल्पाद्वारे केला जाणार आहे. या प्रकल्पांतर्गत माध्यमिक स्तरावरील सेवापूर्व व सेवांतर्गत शिक्षाकांसाठी नवीन अध्यापन पद्धती विकसित केलेल्या आहेत. या प्रकल्पाचे समन्वयक म्हणून अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. प्रतिभा पाटणकर काम पाहत आहेत. ही इंटर्नशिप यशस्वी करण्यासाठी अधिविभागातील प्रा. डॉ.विद्यानंद खंडागळे, प्रकल्पाच्या व्यवस्थापक डॉ. गीतांजली जोशी आदींचे सहकार्य लाभले.

**नवनवीन उपक्रमांचा अभ्यास**

या इंटर्नशिपमध्ये भारतीय शिक्षण पद्धती व युरोपियन शिक्षण पद्धतीमधील अभ्यास केला जाणार आहे. त्यात मुख्यतः शिक्षक प्रशिक्षणाची जागतिक सद्यस्थिती, शिक्षक प्रशिक्षणातील आव्हाने, बदलत्या अध्ययन व अध्यापन पद्धती, शिक्षक प्रशिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण यांचा समावेश आहे.

0 6 MAR 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी चळवळी महत्त्वाच्या : प्राचार्य पाटील



कोल्हापूर : राजर्षी शाहू कॉलेजमधील चर्चासत्रात बोलताना डॉ. व्ही. एम. पाटील.

कोल्हापूर, ता. ५ : 'चळवळी या जिवंत समाजाचे लक्षण आहेत. शासनावर दबाव आणण्यासाठी तसेच आपले सामाजिक प्रश्न सोडविण्याकरीता चळवळी महत्त्वाच्या आहेत. सामाजिक आणि राजकीय चळवळींच्या माध्यमातून समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत विकास पोहचविता येईल,' असे मत न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजमधील इतिहास विभाग आणि भारतीय सामाजिक विज्ञान व अनुसंधान परिषदेतर्फे (आयसीएसएसआर) एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र झाले. डॉ. पाटील यांच्या हस्ते या चर्चासत्राचे उद्घाटन झाले. शाहू कॉलेजचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम, ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य आनंद मेणसे यांनी चळवळींचा आढावा घेतला. शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. रवींद्र भणगे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. दुसऱ्या सत्रात शिवाजी विद्यापीठातील इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनिश पाटील यांनी 'स्वातंत्र्य चळवळीत काही दुर्लक्षित पैलू' यावर मार्गदर्शन केले; तर सत्राध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. अरुण भोसले यांनी मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रामध्ये खुले शोधनिबंध वाचन झाले. या सत्रासाठी वाळवा (जि. सांगली) येथील क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालयचे इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. भारतभूषण माळी आणि डॉ. शिवाजीराव पाटील यांनी सत्राध्यक्ष म्हणून मार्गदर्शन केले. समारोप समारंभासाठी उपप्राचार्या प्रा. डॉ. सिंधू आवळे यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. कदम अध्यक्षपदी होते. या चर्चासत्रासाठी रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्या सरोज पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. समन्वयक प्रा. डॉ. सुप्रिया खोले यांनी प्रास्ताविक केले. एस. डी. मुरकर, एस. आर. माजगावकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. करीम मुल्ला, प्रा. विनोद आखाडे, प्रा. निलेश वळकुंजे, प्रा. अंकुश घुले, डॉ. महेश रणदिवे आदी प्राध्यापकांनी सहसमन्वयक म्हणून काम पाहिले.

सकाळ




**कोल्हापूर : राजाराम महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर शिवाजी विद्यापीठात पार पडले.**

# 'राजाराम'चे एनएसएस शिबिर उत्साहात

**कोल्हापूर :** येथील राजाराम महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विशेष श्रमसंस्कार शिबिर नुकतेच शिवाजी विद्यापीठात पार पडले. त्यात विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या प्रांगणात स्वच्छता केली. विविध मान्यवरांनी शिबिरातील सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यात अविनाश देशमुख यांनी 'महाविद्यालयीन नाट्यकला आणि व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर, तर संदीप पाटील यांनी 'सेल्फ डिफेन्स' या विषयावर मार्गदर्शन केले. विद्यापीठाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. विनिता रानडे यांनी आपत्कालीन परिस्थितीत प्रथमोपचार कसा करावा, याची माहिती दिली. सांस्कृतिक कार्यक्रमाप्रसंगी 'यिन' चे सहाय्यक व्यवस्थापक अवधूत गायकवाड उपस्थित होते. शिबिराचा समारोप प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत, तर डॉ. रघुनाथ कडाकणे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. प्राचार्या डॉ. वाय. सी. अत्तार यांचे शिबिराच्या आयोजनासाठी मार्गदर्शन लाभले. एनएसएसचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सुरज सोनवणे यांनी प्रास्ताविक केले. शिबिर संयोजनामध्ये डॉ. व्ही. एम. देशमुख, ज्योती चव्हाण, दिपाली धावणे यांचे सहकार्य लाभले.

06 MAR 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. बाळकृष्ण यांचा 'शिवाजी द ग्रेट' ग्रंथ आता मराठी भाषेत

प्रतिनिधी
कोल्हापूर

थोर इतिहासकार डॉ. बाळकृष्ण यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात युगपुरूष छत्रपती शिवाजी महाराजांवरील 'शिवाजी द ग्रेट" हे चार खंडातील शिवचरित्र इंग्रजी भाषेत लिहिले होते. हे शिवचरित्र आता 'महान शिवाजी" या शीर्षकाखाली मराठी भाषेत वाचण्यासाठी उपलब्ध होणार



आहे. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी राजर्षी शाहू साहित्यमालेतर्गत संपादित केलेल्या शिवाजी द ग्रेट या इंग्रजी भाषेतील शिवचरित्राच्या मराठी अनुवादित महान शिवाजी खंड १ व २ एकत्रित तसेच महान शिवाजी खंड ३ व ४ एकत्रित अशा दोन ग्रंथांचे प्रकाशन

- **'महान शिवाजी" अनुवादित ग्रंथाचे आज प्रकाशन**
- **शिवाजी विद्यापीठात सोहळा**

सोमवार ६ मार्च रोजी होणार आहे.

शिवाजी विद्यापीठातील शाहू सिनेट हॉलमध्ये सकाळी ११ वाजता प्रकाशन सोहळा होणार आहे. ज्येष्ठ संपादक खासदार कुमार केतकर यांच्या हस्ते ग्रंथांचे प्रकाशन होणार असून यावेळी श्रीमंत शाहू छत्रपती आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्राने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहावे. कार्यक्रमस्थळी डॉ. बाळकृष्ण यांच्या शिवचरित्राच्या मराठी अनुवादित एकत्रित चार खंडांचे दोन ग्रंथ एक हजार रूपयात उपलब्ध असणार आहेत, अशी माहिती डॉ. जयसिंगराव पवार आणि प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.